दैनिक नवीन संध्या

RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019

# सिटी इंटरनॅशनलग्रुप ऑफ स्कूलची सांगली, कोल्हापुरातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धाव

**पुणे :** सिटी इंटरनशॅनलग्रुप ऑफ स्कूलच्या सातारा, वानवडी, औंध या ठिकाणी शाखा आहेत. या सर्व शाखांनी कोल्हापूर, सांगली येथीलपूरग्रस्तांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, कपडे आणि अन्य जीवनावश्यक वस्तूपूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी पाठविल्या. मागील दोन आठवड्यात विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये या वस्तू जमा केल्या. या मोहिमेमध्ये मोठ्य संख्येन मुले सहभागी झाली होती. त्यांनी जीवनावश्यक औषधे, प्रथमोपचार साहित्य, कपडे, ब्लॅंकेट्स आणि बेडशिट्स, कॅंडल्स, टॉर्च, तांदूळ, दाळ, कडधान्य इत्यादी साहित्य गोळाकेले. हे साहित्य पूरग्रस्तांपर्यंत पोहचविण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांनी मेहनतघेतली. प्रत्येक शाळेतून ६० हून अधिक पेट्या पूरग्रस्त



मदत केंद्रांना पाठविण्यात आल्या.

तिन्ही शाळांच्या प्राचार्यांनी विद्यार्थी, शिक्षकांना मार्गदर्शनकेले. सिटी इंटरनॅशनलग्रुप ऑफ स्कूलचे विश्वस्त व संचालक मौलिक शाह म्हणाले, पूरग्रस्तांनाकरण्यातआलेल्या या छोट्या मदतीतून मुलांमध्ये सामाजिक बांधिलकीचीजाणीव निर्माणहोईल.

तसेच कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील नागरिकांना आवश्यक ती मदत मिळू शकणार आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि अन्य सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मना पासून केलेली ही मदत निश्चितच आमच्यासाठी कौतुकास्पद आहे.